Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

FRIDAY, 17TH DECEMBER 1897.

☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

खालीं दिलेला मसुदा आणि त्याच्या सोबतचें हेतु व कारणें यांचें निरूपण हीं, मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या सभांच्या वेळीं काम चालविण्या-बाबदच्या कानूंपैकीं २२ व्या कानूअन्वयें प्रसिद्ध केलीं आहेत :—

### सन १८९७ चा मसुदा नंबर ४.

### सन १८७९ चा मुंबईचा पोर्ट ट्रस्ट आक्ट आणखी सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं सन १८७९ चा मुंबईचा पोर्ट ट्रस्ट आक्ट, यांत खालीं लिहिलेल्या रीतीनें, आणखी सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. सन १८७९ चा मुंबईचा पोर्ट ट्रस्ट आक्ट, ज्यास यांत पुढें सदर्हू आक्ट असें ह्मटलें आहे, त्यांत, १३ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफानंतर खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :— १३ व्या कलमाची सुधारणूक.

" मात्र हमेश असें समजावें कीं गैरहजर असलेल्या ट्रस्टीच्या जागीं, तो गैरहजर असलेला ट्रस्टी निवडून नेमलेला ट्रस्टी असल्यास बोर्डाच्या अर्जावरून, किंवा नांवानें नेमलेला ट्रस्टी असल्यास सरकारच्या नजरेस आलें असतां, तीन महिन्यांहून कमी मुदती-साठीं एकादा मनुष्य निवडून नेमण्यास किंवा नांवानें नेमण्यास सदरील पारिग्राफांतील कोणत्याहि ठरावावरून मनाई नाहीं."

२. सदर्हू आक्टाच्या १४ व्या कलमाच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :— १४ व्या कलमाची सुधारणूक.

" कोणताहि मनुष्य, कीं— ट्रस्टीच्या हुद्याच्या संबंधानें नालायकी.

(अ) जो सर्टिफिकेट न मिळालेला दिवाळखोर किंवा नादार असेल; किंवा

(ब) ज्यास, ज्या अपराधाला साहा महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा किंवा काळेपाण्याची शिक्षा सांगितली असेल तशा एकाद्या अपराधाबदल कैदेची शिक्षा झाली असून ती शिक्षा मागाहून फिरविण्यांत किंवा रद्द करण्यांत आली नसेल; किंवा

(क) जो बोर्डाच्या ताब्यांतील कोणताहि हुद्दा किंवा जागा धारण करीत असेल ; किंवा

(ड) जो बोर्डाशीं, बोर्डानें किंवा बोर्डाच्या वतीनें केलेल्या कोणत्याहि कंट्राक्टांत अगर कामांत, प्रत्यक्ष किंवा पर्यायानें, स्वतः होऊन किंवा आपल्या भागीदारामार्फत, कोणताहि भाग किंवा हितसंबंध ठेवील,

तो मनुष्य ट्रस्टी होण्यास लायक होणार नाहीं.

विशेष ठराव.

मात्र असें ठरविलें आहे कीं कोणत्याहि मनुष्यानें—

(इ) कोणत्याहि स्थावर मिळकतीचा कोणताहि पट्टा, विक्री, अदलाबदल किंवा खरेदी यांत, अगर त्याबदलच्या कोणत्याहि कबुलायतींत; किंवा

(फ) बोर्डाच्या गोदींतील कोणत्याहि रेल्वे साय्डिंगांचा किंवा कोणत्याहि जहाजें नांगरण्याच्या जागेचा, स्वतंत्र रीतीनें किंवा सर्वांच्या अगोदर, उपयोग करण्याचा बोर्डानें दिलेला कोणताहि लैसेन्स किंवा तसें करण्याचा बोर्डाशीं कबुलायत करून किंवा इतर प्रकारें प्राप्त झालेला हक्क यांत; किंवा

(ग) व्याजीं दिलेल्या पैक्याबदलची कोणतीहि कबुलायत किंवा फक्त पैक्याच देण्याबद्दलचें कोणतेंहि तारण यांत ; किंवा

(ह) बोर्डाच्या कामांसंबंधी कोणतीहि जाहिरखबर ज्या कोणत्याहि वर्तमानपत्रांत छापण्यांत येत असेल त्या वर्तमानपत्रांत ; किंवा

(आय्) जी कोणतीहि जाइंट-स्टॉक कंपनी बोर्डाशीं कंट्राक्ट करील किंवा बोर्डाकडून अगर बोर्डाच्या वतीनें कामास लावण्यांत येईल त्या जाइंट-स्टॉक कंपनींत ; किंवा

(जे) तो ज्या कोणत्याहि मालाचा व्यापार करीत असेल तो माल कोणत्याहि एका सरकारी सालांत दोन हजार रुपयांहून ज्यास्त नाहीं इतक्या किंमतीपर्यंत बोर्डास कधीं कधीं विकण्याच्या कामांत ; किंवा

(के) गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं मुद्दाम परवानगी दिलेल्या कोणत्याहि कंट्राक्टांत,

भाग किंवा हितसंबंध ठेविला आहे एवढ्याच केवळ कारणानें तो मनुष्य सदर्हू-प्रमाणें नालायक होईल असें समजूं नये, किंवा त्याचा अशा कंट्राक्टांत अगर कामांत कोणताहि भाग अगर हितसंबंध आहे असें मानूं नये."

१४ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करणें.

३. सदर्हू आक्टाच्या १४ व्या कलमानंतर खालीं दिलेलीं कलमें दाखल करावीं :—

जो ट्रस्टी नालायक होईल तो, ट्रस्टी असण्याचा बंद होणें.

"१४ अ. जो कोणताहि ट्रस्टी—

(अ) सदरील शेवटच्या कलमांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याहि कारणानें नालायक होईल; किंवा

(ब) लागोपाठ बारा महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत बोर्डाच्या सभांतून गैरहजर राहील, किंवा बोर्डाच्या परवानगीवांचून, विशेष सभा खेरीज करून बोर्डाच्या लागोपाठ साहा सभांतून गैरहजर राहील; किंवा

(क) लगत खालच्या कलमांतील ठरावांच्या विरुद्ध वागेल,

तो ट्रस्टी असण्याचा बंद होईल व त्याची जागा रिकामी होईल असें समजावें.

" १४ ब. ट्रस्टीनें बोर्डाच्या कोणत्याहि सभेंत किंवा त्याच्या एखाद्या कमिटींत, ज्या कोणत्याहि गोष्टींत त्यानें प्रत्यक्ष किंवा पर्यायानें, स्वतः होऊन किंवा आपल्या भागीदारामार्फत, १४ व्या कलमाच्या विशेष ठरावांत सांगितलेल्या प्रकारचा कोणताहि भाग किंवा हितसंबंध ठेविला असेल, अगर ज्यांत त्याचा, धंद्यापरत्वें कुत्याच्या वतीनें, किंवा कोणत्याहि मनुष्याचा एजंट या नात्यानें हितसंबंध असेल त्या गोष्टीसंबंधी वादांत आपलें अंग घालूं नये किंवा त्या गोष्टीच्या संबंधानें मत देऊं नये." ट्रस्टीनें केव्हां बोर्डाच्या कोणत्याहि सभेंत किंवा त्याच्या एकाद्या कमिटींत कोणत्याहि गोष्टींसंबंधीं वादांत आपलें अंग घालूं नये किंवा त्या गोष्टींच्या संबंधानें मत देऊं नये.

४. सदर्हू आक्टाच्या १५ व्या कलमांत, त्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांतील विशेष ठरावाच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— १५ व्या कलमाची सुधारणूक.

"मात्र असें ठरविलें आहे कीं कोणत्याहि ट्रस्टीस, कोणत्याहि एका आठवड्यांत भरलेल्या विशेष सभा खेरीज करून इतर कितीहि सभांमध्यें हजर राहण्याबदल तीस रुपयांहून ज्यास्त रकम देण्यांत येणार नाहीं.

चेअरमन खेरीज करून इतर प्रत्येक ट्रस्टीस, १६ व्या कलमाच्या (५) व्या रकमेअन्वयें कमिटीची जी जी विशेष सभा बोलाविली असेल व जींत काम चालविण्यास पाहिजे असतील तितके ट्रस्टी हजर असून तो आरंभापासून अखेरपर्यंत हजर राहील, त्या प्रत्येक विशेष सभेबदल पंधरा रुपये फी मिळण्याचा हक्क असेल असें समजावें."

५. सन १८८३ च्या मुंबईच्या ३ ऱ्या आक्टावरून सुधारलेल्या सदर्हू आक्टाच्या २१ व्या कलमाच्या विशेष ठरावांत, "रकमा (५) व (६)" या शब्दांच्या व आंकड्यांच्या ऐवजीं "रकमा (५), (६) व (७)" हे शब्द व आंकडे दाखल करावे. २१ व्या कलमाची सुधारणूक.

६. सदर्हू आक्टाच्या २२ व्या कलमांत, खालीं दिलेला मजकूर वाढवावा ह्मणजे:— २२ व्या कलमाची सुधारणूक.

"आपलें काम बजावीत असतां, सदर्हू अमलदारांपैकीं व नोकरांपैकीं कोणास दुखापत झाल्यास त्याला, अगर सदर्हू अमलदारांपैकीं व नोकरांपैकीं कोणी मरण पावल्यास त्याच्या मागें जीवंत असलेल्या त्याच्या नातेवाईकांस कोणत्या शर्तींवर पेनशन, ग्राच्युइटी किंवा कंपाशनेट अलावन्स द्यावें त्या शर्ती ठरविण्याबाबत."

७. सदर्हू आक्टाच्या २३ व्या कलमांत, "२२ व्या कलमाअन्वयें बोर्डानें केलेल्या सदर्हू ज्या कानू व जें परिशिष्ट विवक्षितकाळीं अमलांत असेल त्यांतील ठरावांस अनुसरून" या मजकुराच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— २३ व्या कलमाची सुधारणूक.

"२१ व्या कलमाअन्वयें बोर्डानें त्या त्या काळीं मंजूर केलेल्या परिशिष्टांतील, आणि त्या त्या काळीं अमलांत असलेल्या कानूंतील ठरावांस अनुसरून."

८. सदर्हू आक्टाच्या ३७ व्या कलमांत, "साफ ठेविला पाहिजे" ह्या शब्दांनीं संपणाऱ्या पहिल्या वाक्याच्या नंतर खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— ३७ व्या कलमाची सुधारणूक.

"मात्र असें ठरविलें आहे कीं असा जो कोणताहि रस्ता किंवा रहदारीचा रस्ता सन १८९ च्या महिन्याच्या तारखेनंतर सर्वांशीं केलेला असेल त्याच्या संबंधानें कमिशनर, सदर्हूप्रमाणें जाहीर करण्यापूर्वीं, त्यावरील पाणी काढून लावण्याची सोई केलेली असल्याबदल आणि फाणस, फाणसांचे खांब व त्या रस्त्यांत दिवे लावण्याकरितां जें इतर सामान जरूर आहे असें त्यास वाटेल तें सामान यांची तजवीज केलेली असल्याबदल आपली खात्री करून देण्याविषयीं आणखी फर्माविण्यास मुखत्यार आहे."

९. सदर्हू आक्टाच्या ४३ व्या कलमाचे शेवटचे तीन पारिग्राफ रद्द केले आहेत. ४३ व्या कलमाचा भाग रद्द करणें.

४३ व्या कलमानंतर दोन नवीन कलमें दाखल करणें.

१०. सदरहू आक्टाच्या ४३ व्या कलमानंतर, खालीं दिलेलीं दोन नवीन कलमें दाखल करावीं, ह्मणजे :—

गोदी वगैरेंचा उपयोग करण्याबाबत चार्जाचें कोष्टक.

"४३ अ. तसेंच बोर्डास खालील बाबतींबाबत ध्यावयाच्या चार्जाचेंहि कोष्टक तयार करण्याचा अधिकार आहे—

(अ) बोर्डाच्या ताब्यांतील कोणत्याहि गोदीचा उपयोग करण्याच्या परवानगीबाबत व तशा गोदीचा उपयोग करण्याबाबत, आणि तशा गोदीचा उपयोग करीत असणाऱ्या कोणत्याहि जहाजास किंवा तींत काम करणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास बोर्ड जी कांहीं मदत करील त्या मदतीबावत व सदरहू प्रकारच्या जहाजाच्या किंवा मनुष्याच्या कामासाठीं जें कोणतेंहि जियर, टाकल (दोरखंड), हत्यारें, आउतें, हांडींभांडीं, परांचीचें सामान किंवा इतर सामान बोर्डाकडून पुरविण्यांत येईल त्याबाबत,

(ब) ६८ व्या कलमांतील ठरावांस अनुसरून, बोर्डाच्या किंवा बोर्डानें ठेविलेल्या पाण्याच्या बोटी, बार्जिस (नावा) व फायर एन्जिनें यांच्या उपयोगाबावत, आणि ६८ व्या कलमांतील ठरावांबरहुकुम बोर्डानें पुरविलेल्या पाण्याबावत, आणि

(क) बंदराच्या हद्दीबाहेरील जाहजें दोरी लावून ओढून घेण्याबाबत आणि त्या जाहजांस ६८ व्या कलमाच्या (९) व्या रकमेंत सांगितल्या प्रकारची मदत करण्याबाबत.

सदरील शेवटच्या दोन कलमांअन्वयें तयार केलेलीं कोष्टकें मंजुरीसाठीं सरकारास सादर करणें.

"४३ ब. (१) सदरील शेवटल्या दोन कलमांपैकीं कोणत्याहि कलमाअन्वयें बोर्डानें तयार केलेलें प्रत्येक कोष्टक मंजुरीसाठीं सरकारास सादर केलें पाहिजे; व तें याप्रमाणें मंजूर होऊन मुंबई सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें ह्मणजे कायद्याप्रमाणें अमलांत येईल; आणि तशीच मंजूरी घेण्यास व प्रसिद्ध करण्यास पात्र राहून बोर्डास वेळोवेळीं तें सुधारण्याचा किंवा त्यांत मजकूर वाढविण्याचा अधिकार आहे.

विशेष बाबतींत रेट माफ करण्याचा अधिकार आहे.

"(२) बोर्डास, विशेष बाबतींत, सरकारची पूर्वी मंजूरी घेऊन, या कलमाअन्वयें अमलांत असलेल्या कोणत्याहि कोष्टकाबरहुकुम ध्यावयाचे रेट किंवा कोणताहि चार्ज, सर्वांशीं किंवा अंशतः माफ करण्याचा अधिकार आहे."

४९ व्या कलमाची सुधारणूक.

११. सदरहू आक्टाच्या ४९ व्या कलमाच्या (५) व्या रकमेनंतर खालीं दिलेली रकम दाखल करावी, ह्मणजे :—

(६) आपलें काम बजावीत असतां, बोर्डाच्या दुखापत झालेल्या अमलदारांस व नोकरांस, किंवा बोर्डाच्या मरण पावलेल्या अमलदारांच्या व नोकरांच्या मागें जीवंत असलेल्या नातेवाईकांस बोर्डानें दिलेल्या पेनशनांच्या, ग्राच्युइटींच्या व कंपाशनेट अलावन्सच्या रकमा."

५० व्या कलमाची सुधारणूक.

१२. सदरहू आक्टाच्या ५० व्या कलमांत, खालील मजकूर वाढवावा, ह्मणजे :—

"(४) आपलें काम बजावीत असतां, पैलट-सर्व्हिसमध्यें कामास ठेवलेल्या ज्या पैलटांस आणि इतर अमलदारांस व नोकरांस दुखापत झाली असेल त्यांना, व सदरहूप्रमाणें कामास ठेवलेले जे पैलट, अमलदार व नोकर मरण पावले असतील त्यांच्या मागें जीवंत असलेल्या नातेवाईकांस बोर्डानें दिलेलीं पेनशनें, ग्राच्युइटी व कंपाशनेट अलावन्स देण्याच्या कामीं".

६७ व्या कलमानंतर नवीन कलम वाढविणें.

१३. सदरहू आक्टाच्या ६७ व्या कलमानंतर, खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजे :—

"६७ अ. सदरील शेवटल्या सात कलमांमध्यें व कलम ८९ यांत कसाहि ठराव असला तथापि, या आक्टाअन्वयें किंवा या आक्टास अनुसरून केलेल्या कोणत्याहि पोट-कानूंअन्वयें बोर्डास द्यावयाचे किंवा बोर्डानें वसूल करावयाचे कोणतेहि टोल, ड्यूझ्, भाडीं, रेट, चार्ज, नुकसानी, केलेला खर्च, खर्च, किंवा विक्रीच्या प्रसंगीं विक्रीचें उत्पन्न व्हावें तेवढें झालें नसेल तेव्हां त्यासंबंधी बाकी रकम, किंवा कोणतीहि गुन्हेगारी अगर दंड, दावा करून वसूल करण्याचा बोर्डास अधिकार आहे." दावा करून वसूल करण्याचा वैकल्पिक उपाय.

१४. सदर्हू आक्टाच्या ६८ व्या कलमांत, त्या कलमाची रकम (७) व विशेष ठराव यांच्या दरमियान खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— ६८व्या कलमाची सुधारणूक.

"(८) बोर्डाच्या मालमत्तेस आग लागल्यास ती विझविणें, व त्या कारणासाठीं एन्जिनें तयार ठेवणें, तीं चांगल्या स्थितींत ठेवणें आणि त्यांचा उपयोग करणें;

"(९) कोणतींहि जाहजें, तीं मग बंदरांत येत असोत किंवा बंदर सोडून जात असोत, किंवा इतर कोणत्याहि ठिकाणीं जाणारीं असोत, त्यांना दोरी लावून ओढण्याच्या किंवा मदत करण्याच्या कारणासाठीं, अगर जिवाचा किंवा मालमत्तेचा बचाव किंवा संरक्षण करण्याच्या कारणासाठीं जाहजें, स्टीमटग किंवा इतर बोटी तयार करून ठेवणें व तसाच बंदराच्या हद्दीच्या आंत, आणि त्या हद्दीबाहेरील भर समुद्रावर आणि देशी जलाशयांत किंवा इतर ठिकाणीं, त्यांचा उपयोग करणें;

"(१०) बंदरांतील तारवांस पाणी पुरविणें, आणि त्या कारणासाठीं बोटी व नावा तयार ठेवणें, त्या चांगल्या स्थितींत ठेवणें व त्यांचा उपयोग करणें;

"(११) बंदरांत आग लागली असतां ती विझविणें, आणि त्या कारणासाठीं एन्जिनें तयार ठेवणें, तीं चांगल्या स्थितींत ठेवणें व त्यांचा उपयोग करणें:

"मात्र असें ठरविलें आहे कीं जर मुंबईच्या म्युनिसिपल कमिशनरानें कोणत्याहि वर्षीं सेप्टेंबर महिन्याच्या तेराव्या तारखेस बोर्डास अशी लेखी नोटीस दिली असेल कीं त्या बाबतींत आपणास असलेला अधिकार चालवून आपण त्यानंतरच्या लगत पुढल्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून, रकम (१०) हींत निर्दिष्ट केलेलीं कामें, किंवा रकम (११) हींत निर्दिष्ट केलेलीं कामें किंवा सदर्हू दोन्हीं रकमांत निर्दिष्ट केलेलीं कामें यांतून जीं अशा नोटिसींत नमूद केलीं असतील तीं करण्याचें काम आपणाकडे घेणार आहों, तर त्याचे खालीं सांगितल्याप्रमाणें परिणाम घडतील:

(१) अशी नोटीस मिळाल्यानंतर लगत पुढल्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेरोजीं:

(अ) नोटिशींत नमूद केलेलीं कामें,

(१) करण्याचा, आणि

(२) त्यांचा त्यानंतर उपयोग करण्याबद्दल चार्ज घेण्याचा,

बोर्डास असलेला अधिकार संपेल, मात्र तेणेंकरून, सदर्हूप्रमाणें उपयोग करण्याच्या संबंधानें जे कोणतेहि त्यापूर्वींचे चार्ज घ्यावयाचे असतील ते वसूल करण्याच्या बोर्डाच्या हक्कास व्यत्यय येणार नाहीं;

(ब) नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या कामांच्या कारणासाठीं बोर्डानें तत्पूर्वीं कामीं लावलेल्या ज्या बोटी, व अचल एन्जिनें खेरीज करून इतर एंजिनें आणि तत्संबंधी जीं यंत्रें, साधनें व सामान बोर्डापासून घेऊन संपादन करण्याविषयीं मुंबईच्या म्युनिसिपालिटीस बोर्ड सांगेल त्या सर्व बोटी व एन्जिनें आणि तीं सर्व यंत्रें, साधनें व सामान सदहू म्युनिसिपालिटीनें त्याप्रमाणें घेऊन संपादन केलीं पाहिजेत; आणि

(२) सदहू म्युनिसिपालिटीनें बोर्डास, या कलमाअन्वयें घेऊन संपादन केलेल्या सर्व बोटी व इतर मालमत्ता यांची किंमत ह्मणून, त्या कारणासाठीं बोर्डानें एक व म्युनिसिपालिटीनें एक याप्रमाणें नेमलेल्या दोघां मनुष्यांकडून त्या बोटींच्या व मालमत्तेच्या संबंधानें जी रकम किंवा ज्या रकमा ठरविण्यांत येतील ती रकम किंवा त्या रकमा, अगर त्या दोन मनुष्यांमध्यें मतभेद पडला तर त्या प्रसंगीं सरकार ठरवील ती रकम किंवा त्या रकमा दिल्या पाहिजेत."

७८व्या कलमाची सुधारणूक.

१५. सदहू आक्टाच्या ७८व्या कलमाच्या विशेष ठरावाच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

"मात्र असें ठरविलें आहे कीं या कलमांतील कोणताहि ठराव, जो मनुष्य नालायक नाहीं असें किंवा ज्या मनुष्याचा कोणत्याहि कंट्राक्टांत अगर कामांत कोणताहि भाग किंवा हितसंबंध आहे ह्मणून मानूं नये असें १४व्या कलमाच्या दुसऱ्या पोट-कलमांत ठरविलें आहे त्यास लागू नाहीं असें समजावें."

८४व्या कलमाची सुधारणूक.

१६. सदहू आक्टाच्या ८४ व्या कलमांत, "अशा नुकसानीची रकम, बोर्डानें अर्जी केली असतां" या शब्दांच्या ऐवजीं "असें नुकसान कोणत्याहि प्रकारें अशा अमलदाराच्या हुकुमामुळें, कृत्यामुळें किंवा गैरवाजवी वर्जनामुळें घडून आलें नसेल तर त्या प्रसंगीं खेरीज करून इतर प्रसंगीं त्याची रकम, बोर्डानें अर्जी केली असतां" हे शब्द दाखल करावे.

कायदे रद्द करणें.

१७. परिशिष्टांत सांगितलेले कायदे, त्याच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केले आहेत तेथवर, रद्द केले आहेत.

---

## परिशिष्ट.

(कलम १७ पहा.)

| कायदे. | विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ६. | मुंबईचा पोर्ट ट्रस्ट आक्ट. | कलम ३ पोट-कलम (२) "आणि सदहूप्रमाणें जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत येईल" या शब्दांपासून त्या पोट-कलमाच्या अखेरपर्यंतचा सर्व मजकूर.<br>कलम ९ आरंभापासून तों "इतर प्रत्येक प्रसंगीं" हे शब्द धरून या शब्दांपर्यंतचा मजकूर. |

परिशिष्ट.—चालू.

( कलम १७ पहा. )—चालू.

| कायदे. | विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| | | कलम १०, आरंभापासून तों "आणि इतर प्रत्येक प्रसंगीं" हे शब्द धरून या शब्दांपर्यंतचा मजकूर.<br>कलम २१, दुसरा पारिग्राफ.<br>कलम ४३, "या कलमाअन्वयें रेटांचें कोष्टक" या शब्दांनीं सुरू होऊन "प्रसिद्ध झालें आहे असें समजावें" या शब्दांनीं संपणारें वाक्य.<br>कलम ९७. |
| सन १८८३ चा मुंबईचा आक्ट ३. | सन १८७९ चा मुंबईचा ६ वा आक्ट सुधारण्याबाबत मुंबईचा पोर्ट ट्रस्ट आक्ट. | कलम ९. |

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्याचा हेतु म्हटला म्हणजे, सन १८७९ च्या मुंबईच्या पोर्ट ट्रस्ट आक्टांत, यांत खालीं सांगितलेल्या कारणांसाठीं, खालीं सांगितलेल्या सुधारणा करणें इष्ट असल्यामुळें त्या करणें हा होय :—

(१) सदर्हू आक्टाच्या १३ व्या कलमाच्या शेवटच्या पारिग्राफावरून, एकादी रिकामी झालेली जागा तीन महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंत रिकामी राहिली असेल किंवा रिकामी राहील असें वाटेल तेव्हांच मात्र ती हंगामी रिकामी झालेली जागा भरण्यासाठीं निवड किंवा नेमणूक करण्याची परवानगी दिली असल्यामुळें, त्या पारिग्राफांत दिलेल्या परिमित अधिकारांपासून व्यावहारिकरीत्या कांहीं गैरसोय होते असें आढळून आलें आहे. अशी गोष्ट कधीं कधीं घडून येते कीं एकाद्या ट्रस्टीस विशेष विषयांचें पारिभाषिक ज्ञान असून तो तीन महिन्यांहून कमी मुदतीपर्यंत गैरहजर असतो आणि त्या थोड्याशा मुदतींत सुद्धा त्याच्या जागीं एकादा कुशल मनुष्य असावा हें इष्ट असतें. यास्तव जिच्या योगानें बोर्डास वर सांगितल्या प्रकारची मदत हल्लीं मिळूं शकत नाहीं ती इयत्ता काढून टाकण्याचें या मसुद्याच्या १ ल्या कलमांत योजिलें आहे.

(२) सदर्हू आक्टाचें कलम १४ हें, ट्रस्टीच्या जागेसाठीं नालायकी या विषयासंबंधीं आहे. ट्रस्टीच्या ताब्यांत गोदी व धक्के, आणि बंदरच्या व्यापाराच्या कामीं ज्यांचा उपयोग करण्यांत येतो अशा बहुतेक वखारी व जमिनी असल्यामुळें, व्यापाराशीं किंवा तारवांशीं संबंध असणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास, ज्यांस अधिक किंवा कमी प्रमाणानें कंट्राक्टांचें रूप येतें अशा कांहीं व्यवस्था ट्रस्टशीं केल्यावांचून धंदा चालविण्याचें काम खरोखर अशक्य होत असतें. १४ व्या कलमाचे ठराव सक्त रीतीनें अमलांत आणले असतां, असा परिणाम होण्याचा संभव आहे कीं, जी कोणतीहि फर्म कंट्राक्टाच्या कोणत्याहि रूपानें ( उदाहरणार्थ, एकादा पट्टा करून ) ट्रस्टनें दिलेल्या जागेचा उपयोग करील त्या फर्मच्या मेंबरांची बोर्डाचें काम चालविण्याच्या कामीं व्यवहाररीत्या मुळींच मदत मिळणार नाहीं. शिवाय ट्रस्टला कोणत्याहि यंत्राची किंवा इतर वस्तूची निकडीची गरज लागली असून तें यंत्र किंवा

ती वस्तु, ज्या फर्मच्या मेंबरांपैकीं एकादा मेंबर त्या वेळीं एक ट्रस्टी असेल त्याच फक्त फर्मकडे विकावयाची असल्यास तें यंत्र किंवा ती वस्तु त्या फर्मकडून बोर्डास विकत घेतां येत नाहीं. बोर्डांतील एकंदर तेरा ट्रस्टींपैकीं आठजण बंदराच्या व्यापाराचे प्रतिनिधि आहेत. ह्या प्रतिनिधींची संख्या बरीच मोठी असावी, आणि व्यापार व तारवें यांत ज्यांचा पुष्कळ हितसंबंध असेल अशीं मनुष्यें नेमून ह्या जागा भराव्या ही गोष्ट फार इष्ट आहे; परंतु सदरील कारणावरूनच अशा मनुष्यांची ट्रस्टशीं व्यापारासंबंधी पुष्कळ देवघेव असण्याचा ज्यास्त संभव आहे.

या कारणासाठीं सदर्हू आक्टाचें १४ वें कलम सुधारणें जरूर आहे, आणि तसें करण्यासाठीं सन १८८८ चा मुंबई शहर म्युनिसिपल आक्ट यांतील त्या प्रकारचे कित्येक ठराव, उदाहरणार्थ, त्या आक्टाचें कलम १६ (२) (ग) व (२) (एल्) आणि कलम ३६, रकम (प), यांच्या वाक्यरचनेचें शब्दशः अनुकरण करण्याचें योजिलें आहे. तसेंच ट्रस्टच्या विशेष प्रकारच्या स्थितीस अनुलक्षून या मसुद्यांत दोन नवीन ठराव (नवीन १४ व्या कलमाच्या रकमा (फ) व (के) ) दाखल केले आहेत.

हे निरनिराळे ठराव १४, १४ अ व १४ ब या तीन नवीन कलमांत दाखल करणें इष्ट असल्याचें आढळून आलें आहे व हीं नवीन कलमें सदर्हू आक्टाच्या १४ व्या कलमाच्या ऐवजीं दाखल केलीं असून या मसुद्याच्या २ ऱ्या व ३ ऱ्या कलमांत आढळून येतील.

(३) एकादा ट्रस्टी बोर्डाच्या लागोपाठ साहा सभांतून गैरहजर राहिल्यास तो १४ व्या कलमाच्या (क) रकमेअन्वयें, नालायक होतो. हा ठराव फारच कडक आहे असें वाटल्यावरून, ज्या लागोपाठ साहा सभांत एकादा ट्रस्टी हजर राहण्यास चुकेल त्या सभा साधारण सभा नसतील तर तो सदर्हूप्रमाणें नालायक होणार नाहीं, असा ठराव नवीन कलम १४ अ, रकम (ब) ( मसुद्याचें कलम ३ ) यांत दाखल करण्याचें योजिलें आहे.

(४) सदर्हू आक्टाच्या १९ व्या कलमांत, एका आठवड्यामध्यें भरलेल्या सभांची संख्या कितीहि असली तथापि त्या सर्वांत हजर राहण्याबदल ट्रस्टींच्या फीची मर्यादा ३० रुपये ठरविली आहे. परंतु ट्रस्टी हे सर्व धंद्याचीं माणसें किंवा कामगार लोक असून त्यांना फुरसत मुळींच मिळत नाहीं, यामुळें त्यांनीं, ज्या विशेष सभा वेळोवेळीं भरण्याची फारच अवश्यकता असते त्या सभांमध्यें कोणत्याहि प्रकारच्या मुशाहिऱ्यावांचून हजर राहावें अशी प्रतीक्षा करणें हें गैरवाजवी आहेसें वाटतें. या मसुद्याच्या ४ थ्या कलमांत सदर्हू ठरावाची सुधारणूक केली असून त्यावरून, हजर राहण्याबदलच्या फीसंबंधी मर्यादेंतून विशेष सभा वगळल्या आहेत व चेअरमनानें बोलाविलेल्या ज्या विशेष कमिटीच्या सभांत हजर राहण्याबदल हल्लीं कांहींच फी मिळत नसते त्या सभांत हजर राहण्याबदल ट्रस्टींना १९ रुपये देण्याचें ठरविलें आहे.

(५) बोर्डानें कामास ठेवलेले किंवा पैलट सर्व्हिसमधील अमलदार व नोकर; आपलें काम बजावीत असतां त्यांस दुखापत झाल्यास त्यांना, अगर ते मरण पावल्यास त्यांच्या मागें जीवंत राहिलेल्या नातेवाईकांना पेनशनें, ग्राच्युइटी किंवा कंपाशनेट अलावन्सें बोर्डास देतां यावीं ह्मणून मुंबईच्या पोर्ट ट्रस्ट आक्टाचीं कलमें २१, २२, ४९ व ५० सुधारणें जरूर झालें आहे. या कारणासाठीं योजलेल्या सुधारणुकी या मसुद्याचीं कलमें ९, ६, ११ व १२ यांत दाखल केल्या आहेत.

(६) या मसुद्याच्या १० व्या कलमांत, सन १८८८ च्या मुंबई शहर म्युनिसिपल आक्टाचें कलम ३०६, कीं ज्यांत, इतर गोष्टींबरोबर, खासगी स्ट्रीट चांगल्या स्थितींत ठेवण्यास कार्पोरेशन पात्र होण्यापूर्वीं त्या स्ट्रीटांतील पाणी काढून लावण्याची तजवीज केली पाहिजे व त्यांवर दिवे लावण्यासाठीं जरूर असलेल्या सामानाची तजवीज केली पाहिजे असें फर्माविलें आहे, त्या कलमाशीं मुंबईच्या पोर्ट ट्रस्ट आक्टाचें ३७ वें कलम जुळेल असें करण्याचें योजिलें आहे.

(७) सदर्हू आक्टाचें सध्या जें ४३ वें कलम आहे त्याप्रमाणें ह्मटलें ह्मणजे सुक्या गोदीचा उपयोग करण्याबदलच्या चार्जांचें कोष्टक ट्रस्टींना तयार करतां येत नाहीं व तें सरकारास मंजूर करतां येत नाहीं. ट्रस्टींनीं नुक्तीच मेअरवेदर सुकी-गोदी बांधून, बंदरच्या तारवांच्या व व्यापाराच्या हितासाठीं ज्या पुष्कळ उपयुक्त कामांची त्यांनीं तजवीज केली असून ते व्यवस्था पाहात आहेत त्या कामांत भर घातली आहे. त्या गोदीचा उपयोग करण्याबदल, आणि लोकांना ते जी मदत करतील व इतर

सोई करून देतील त्याबद्दल, वाजवी चार्ज घेण्याचा त्यांना अधिकार देणें रास्त आहे. तशीच बोर्डानें बंदरांतील तारवांस पाणी पुरविण्याची, आपल्या स्वतःच्या जागेंत व तसेंच बंदरांतील तारवांत आग लागली असतां ती विझविण्याची, आणि बंदराच्या हद्दींबाहेरील जाहजांस मदत करण्याची तजवीजाहि केली आहे. परंतु हल्लीं त्यांना अशा बाबती हातीं घेण्याचा किंवा त्यांबद्दल चार्ज घेण्याचा सदई आक्टाअन्वयें कांहींच अधिकार नाहीं. या मसुद्याचीं कलमें ९ व १० यांचा हेतु ट्रस्टींना हे अधिकार देण्याचा आहे, आणि बंदरांतील मदतीच्या सदई कामांपैकीं जीं कामें मुंबईच्या म्युनिसिपालिटीच्या कायदेशीर अधिकारांच्या टप्प्यांत असतील तीं कामें करण्याचा मुंबईच्या म्युनिसिपालिटीनें निश्चय केल्यास त्यासंबंधानें, त्या मंडळीस ग्राह्य होईल अशा प्रकारचा योग्य ठराव या मसुद्याच्या १४ व्या कलमांत केला आहे.

(८) या मसुद्याच्या १३ व्या कलमांत, हल्लीं जे रेट, चार्ज, गुन्हेगाऱ्या, वगैरे. फक्त माल अटकावून ठेवून व त्या मालाची विक्री करूनच वसूल करण्याचा अधिकार आहे ते रेट, चार्ज, गुन्हेगाऱ्या, वगैरे, दावा-करून वसूल करण्याचा वैकल्पिक उपाय बोर्डास देण्याचें योजिलें आहे. हल्लींचा वर सांगितलेला एकच उपाय समाधानकारक नाहीं; कारण, वारंवार असें घडून येतें कीं अटकावून ठेविलेला माल विकला जाण्यास नालायक असतो, व कित्येक प्रसंगीं तर, तो फार वेळपर्यंत ठेविला असतां त्यापासून पीडा होऊन तो आरोग्यास अपकारक होतो.

(९) या मसुद्याच्या १९ व्या कलमांत, सदई आक्टाचें ७८ वें कलम, जेणेंकरून तें या मसुद्यावरून सुधारलेल्या त्या आक्टाच्या १४ व्या कलमाशीं जुळेल, अशा रीतीनें सुधारण्याचें योजिलें आहे.

(१०) कलम १६ यावरून सदई आक्टांत थोडीशी सुधारणूक करण्याचें ठरविलें आहे व ती सुधारणूक, ज्यावर पैलट असेल अशा कोणत्याहि जाहजाकडून बोर्डाच्या मालमत्तेस कोणतीहि खराबी किंवा नुकसानी झाल्यास ती खराबी किंवा नुकसानी त्या पैलटाच्या कोणत्याहि अपराधामुळें झालें असें ह्मणणें नसेल तेव्हां, त्याबद्दल नुकसानीचा मोबदला बोर्डास वसूल करण्याचा अधिकार देण्यासाठीं, जरूर आहे.

(११) कलम १७ आणि परिशिष्ट यांवरून, सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ६ वा व सन १८८३ चा आक्ट ३ रा यांतील ज्या कित्येक भागांचा आधींच अमल होऊन गेला आहे किंवा जे निरुपयोगी झाले आहेत, ते भाग रद्द होतील.

मुक्काम मुंबई, तारीख २ री डिसेंबर, सन १८९७. (सही.) डब्ल्यू. सी. ह्यूझ्.

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही.) एस्. एल्. ब्याचेलर,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुक्काम मुंबई, तारीख ३ री डिसेंबर, सन १८९७.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.